परिशिष्ट-१

असा. क्र. ३२

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, ऑगस्ट १, २००३/श्रावण १०, शके १९२५**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**— मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम .. .. २४६-२५२

दिनांक ३१ जुलै २००३ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

**सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३.**

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५९ चा मुंबई ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तातडीने कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून त्यांनी दिनांक १७ जून २००३ रोजी मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २००३ आणि २ जुलै २००३ रोजी मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००३ प्रख्यापित केले होते ;

२००३ चा महा. अध्या. ५.
२००३ चा महा. अध्या. ७

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशांचे राज्य विधानमंडळाच्या एकत्रित अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३ असे म्हणावे.

(२) (क) या अधिनियमाची कलमे ४ व ६, दिनांक १४ जानेवारी २००३ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल ; आणि

(ख) या अधिनियमाची कलमे २, ३ व ५, दिनांक २ जुलै २००३ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३ ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ मध्ये, — १९५९ चा मुंबई ३.

(क) खंड (क-३) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-४) "लाभार्थिस्तर उप-समिती" याचा अर्थ ग्रामपंचायतीमधील वसतिस्थान (प्रभाग, वस्ती, वाडी, तांडा, पाडा किंवा कोणत्याही नावाने संबोधण्यात येणारे असे स्वतंत्र वसतिस्थान) किंवा त्याचा भाग याची भौगोलिक, भू-जलशास्त्रीय, तंत्रशास्त्रीय, अर्थशास्त्रीय, सामाजिक आणि लोकसंख्याशास्त्रीय स्थिती विचारात घेऊन एखादा, विशिष्ट कार्यक्रम, योजना, कार्य किंवा उपयुक्तता यांच्याकरिता कलम ४९-क अन्वये घटित करण्यात आलेली उप-समिती, असा आहे ;";

(ख) खंड (२४) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(२४-क) "ग्रामविकास समिती" याचा अर्थ, कलम ४९ अन्वये घटित करण्यात आलेली समिती असा आहे, जी पंचायतीची समिती असल्याचे मानण्यात येईल ;".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४९ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४९ ऐवजी, पुढील कलमे दाखल करण्यात येतील :—

ग्रामविकास समित्या.

"**४९.** (१) ग्रामसभा, पंचायतीशी विचारविनिमय करून, पंचायतीचे सदस्य, ग्रामपंचायत क्षेत्रात काम करणाऱ्या समूहाधारित संघटनांचे प्रतिनिधी, पंचायती, जिल्हा परिषद, राज्य शासन आणि मतदार यांचे ग्रामस्तरावरील कार्यकर्ते, यांच्यामधून, कोणत्याही नावाने संबोधण्यात येतील अशा एक किंवा अधिक ग्रामविकास समित्या घटित करील.

(२) अशा समितीची मुदत पंचायतीच्या मुदतीएवढी असेल.

(३) अशा समित्या, अनुसूची एक मध्ये नमूद केलेले विषय व कार्ये यांबाबत पंचायतीशी विचार विनिमय करून, ग्रामसभेकडून प्रत्यायोजित करण्यात येतील किंवा नेमून देण्यात येतील अशा अधिकारांचा वापर करतील, आणि पंचायतीची अशी कर्तव्ये व कामे, पार पाडतील आणि ग्रामसभा, जिल्हा परिषद, शासन किंवा इतर कोणतेही सक्षम प्राधिकरण यांच्याकडून पंचायतीकडे, वेळोवेळी सोपवण्यात येतील

अशी पंचायतीशी संबंधित किंवा तिच्याशी संलग्न असलेली इतर कामे व कार्ये पार पाडतील. ग्रामसभेला, पंचायतीचे सर्वसाधारण पर्यवेक्षण आणि नियंत्रण यांना अधीन राहून, अशा समित्यांच्या कार्यपद्धतीचे नियमन करता येईल.

(४) ग्रामविकास समितीतील सदस्यांची एकूण संख्या, बारापेक्षा कमी नसेल आणि चोवीसपेक्षा जास्त नसेल :

परंतु,—

(क) तिच्या सदस्यांपैकी एक-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतके सदस्य पंचायतीच्या सदस्यांमधील असतील ;

(ख) तिच्या सदस्यांपैकी एक-द्वितीयांपेक्षा कमी नसतील इतके सदस्य महिला असतील ; आणि

(ग) त्या बाबतीत शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा संख्येतील सदस्य, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती (यात यापुढे ज्यांचा उल्लेख "दुर्बल वर्ग" असा करण्यात आला आहे) यातील असतील :

परंतु आणखी असे की, जेव्हा ग्रामविकास समिती ही केवळ महिलांच्या किंवा दुर्बल वर्गांच्या हितासाठी करावयाचे एखादे कृति कार्यक्रम, योजना किंवा उपयुक्तता यांच्या प्रयोजनासाठी घटित करण्यात आली असेल तेव्हा अशा समितीमधील महिला सदस्यांचे किंवा यथास्थिति, दुर्बल वर्ग सदस्यांचे संख्याबळ हे समिती सदस्यांच्या एकूण संख्येच्या तीन-चतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही

(घ) ग्रामसभा, ग्रामविकास समितीमध्ये, ग्राम महिला मंडळ किंवा या प्रयोजनासाठी विशेषरीत्या बोलाविण्यात आलेली महिला मतदारांची ग्रामसभा यांच्याकडून शिफारस करण्यात येईल अशा महिला सदस्यांचे सामान्यपणे नामनिर्देशन करील. पुरेसे कारण असले तर ते कामकाजामध्ये नमूद करून मगच ग्रामसभेला अशी कोणतीही शिफारस नाकारता येईल ;

(ङ) ग्रामसभेला, तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार, महिला मंडळे, युथ क्लब (युवक संघ) इत्यादी सारख्या कोणत्याही ग्रामस्तरावरील संस्थांच्या सदस्यांना पसंतीक्रम देता येईल ;

(च) ग्रामसभेला शिक्षक, तलाठी, अंगणवाडी सेविका, गावातील पाणीवाले, ग्रामीण आरोग्य सेवक, यांसारख्या ग्रामीण भागात काम करणारे शासनाचे निम-शासनाचे, जिल्हा परिषदेचे ग्रामस्तरावरील कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांना देखील, कोणत्याही बाबीवर किंवा बाबींवर सहाय्य करण्याच्या किंवा सल्ला देण्याच्या प्रयोजनासाठी ग्रामविकास समितीच्या सभेला किंवा सभांना हजर राहण्यासाठी विशेष आमंत्रित म्हणून बोलावता येईल. अशा आमंत्रित केलेल्या अधिकाऱ्याला कामकाजामध्ये भाग घेता येईल, परंतु त्याला मतदानाचा अधिकार असणार नाही.

(५) पोट-कलम (१) अन्वये घटित केलेली ग्रामविकास समिती ही पंचायतीची समिती असल्याचे मानण्यात येईल आणि ती, पंचायतीच्या सर्वंकष पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली असेल. पंचायतीची प्रशासकीय यंत्रणा जशी पंचायतीला सहाय्य करते तशीच ती अशा समितीला सहाय्य करील.

(६) ग्रामविकास समितीच्या लेख्यांचे वार्षिक विवरण व कामकाज, दैनंदिन सोयीसाठी स्वतंत्रपणे ठेवण्यात येईल व जतन करण्यात येईल, मात्र पंचायत अभिलेखाचा, लेख्यांचा व कामकाजाचा तो अविभाज्य भाग असेल, आणि पंचायतीमार्फत, पंचायतीच्या वार्षिक अर्थसंकल्पाला मान्यता देण्याच्या आणि वार्षिक लेख्यांना मंजुरी देण्याच्या प्रयोजनासाठी विशेष रीत्या बोलाविण्यात आलेल्या ग्रामसभेच्या सभेमध्ये, ते सादर करण्यात येईल.

(७) ग्रामविकास समितीचे अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये काढून घेण्याच्या आणि ग्रामपंचायतीला, त्यांची कार्ये परत घेऊन देण्याच्या प्रयोजनासाठी खास बोलविलेल्या बैठकीमध्ये उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन-तृतीयांशापेक्षा कमी नाही इतक्या बहुमताने, असाधारण परिस्थितीमध्ये, अशी परिस्थिती नमूद करून आणि तिला मान्यता देऊन ग्रामसभेद्वारे तसे ठरविले असल्याखेरीज, सामान्यतः पंचायत, ग्रामसभेकडून ग्रामविकास समितीकडे सोपविण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करणार नाही आणि तिची कर्तव्ये आणि कार्ये पार पाडणार नाही.

(८) (क) ग्रामविकास समितीचे एकदा नियुक्त केलेले सदस्य, पुढील बाबी वगळता, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेला त्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी, पदावरून दूर करण्यात येणार नाही किंवा परत बोलावले जाणार नाहीत :—

(एक) त्या प्रयोजनासाठी यथोचितरीत्या बोलाविलेल्या बैठकीमध्ये ग्रामसभेने तसा स्पष्ट निर्णय संमत केला असल्याखेरीज, किंवा

(दोन) अशा, सदस्याला, कलम १४ मध्ये, पंचायत सदस्यांसाठी विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही निरर्हता लागू असल्याखेरीज ;

(ख) ग्रामविकास समितीच्या सदस्याचा मृत्यू त्याचा राजीनामा, त्याला पदावरून काढून टाकणे किंवा परत बोलावणे किंवा अन्य प्रकारची सदस्याची निरर्हता यामुळे रिक्त झालेले कोणतेही पद पोट-कलमे (१), (२) आणि (४) या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे भरण्यात येईल.

(९) नवीन पंचायत घटित झाल्यावर, नवीन पंचायत घटित झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत ग्रामविकास समिती पुनर्घटित करण्यात येईल ;

परंतु, आधीच्या समितीच्या सदस्यांना, ते अन्यथा पात्र असतील तर, नवीन समितीवर पुनर्नियुक्तीसाठी कोणतीही आडकाठी करण्यात येणार नाही.

लाभार्थी स्तर उप-समिती. **४९-क.** (१) कलम ४९ च्या पोट-कलम (१) अन्वये घटीत करण्यात आलेल्या ग्रामविकास समितीला, पंचायतीशी विचारविनिमय करून आणि ग्रामसभेच्या पूर्वमान्यतेने आणि इष्ट वाटल्यास, पंचायत क्षेत्रातील वस्तीची भौगोलिक, भू-जलशास्त्रीय, तंत्रशास्त्राविषयक, आर्थिक, सामाजिक व लोकसंख्याविषयक स्थिती विचारात घेऊन, केवळ त्या वस्तीसाठीच असलेल्या विद्यमान किंवा प्रस्तावित कृती कार्यक्रम, योजना अथवा उपयोगिता यांच्या लाभार्थी मतदारांच्या निवडणुकीकरिता म्हणून घेण्यात येणाऱ्या बैठकीमध्ये ज्यात प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला एक मत असेल-एक लाभार्थी स्तर उप-समिती घटीत करता येईल.

(२) अशा समितीची मुदत पंचायतीच्या मुदतीएवढी असेल.

(३) ग्रामविकास समितीला, ग्रामपंचायतीच्या मान्यतेने, विनिर्दिष्ट कृती कार्यक्रम, योजना किंवा उपयोगितेच्या संबंधातील तिचे अधिकार, प्राधिकार, कार्ये आणि कर्तव्ये लाभार्थी स्तर उप-समितीकडे सोपवता येतील.

(४) लाभार्थी स्तर उप-समितीतील सदस्यांची एकूण संख्या बाराहून अधिक असणार नाहीः-

परंतु,—

(क) लाभार्थी स्तर उप-समिती ज्यासाठी घटीत केली असेल अशा योजनेचे, कृती कार्यक्रमाचे किंवा उपयोगितेचे जे लाभार्थी आहेत असे पंचायत सदस्य हे अशा लाभार्थी स्तर उप-समितीचे सदस्य असतील ;

(ख) समितीच्या सदस्यांपैकी एक-द्वितीयांशापेक्षा कमी नसतील इतके सदस्य महिला असतील; आणि

(ग) याबाबतीत शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल तेवढ्या प्रमाणात उक्त समितीवरील पदे राखून ठेवण्यात येतील व ती दुर्बल घटकातील सदस्यांमधून भरण्यात येतील.

(५) लाभार्थी स्तर उप-समिती, ती ज्यासाठी घटीत करण्यात आली असेल असे कृती कार्यक्रम, योजना किंवा उपयोगिता यांच्या संबंधातील अधिकारांचा वापर करील आणि त्याच्याशी संबंधित कर्तव्य आणि कार्ये पार पाडील आणि ती संबंधित ग्रामविकास समितीचे सर्वंकष अधीक्षण, नियंत्रण आणि मार्गदर्शन यांना अधीन असेल.

(६) (क) एकदा नियुक्त केलेल्या लाभार्थी स्तर उप-समितीच्या सदस्यांना पुढील बाबी वगळता, पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेल्या त्यांचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी, पदावरून दूर करण्यात येणार नाही किंवा परत बोलावले जाणार नाहीत :—

(एक) त्या प्रयोजनासठी यथोचितरित्या बोलाविल्या बैठकीमध्ये ग्रामसभेने किंवा यथास्थिती, कृती कार्यक्रम, योजना किंवा उपयोगिता यांचे लाभार्थी मतदार यांनी तसा स्पष्ट निर्णय संमत केला असल्याखेरीज, किंवा

(दोन) अशा सदस्याला, कलम १४ मध्ये, पंचायत सदस्यांसाठी विनिर्दिष्ट केलेल्यापैकी कोणतीही निरर्हता लागू असल्याखेरीज ;

(ख) लाभार्थी स्तर उप-समितीच्या सदस्याचा मृत्यू त्याचा राजीनामा, त्याला पदावरून काढून टाकणे वा परत बोलावणे किंवा अन्य प्रकारची सदस्याची निरर्हता यामुळे रिक्त झालेले कोणतेही पद, पोट-कलमे (१), (२) अणि (४) याखाली तरतूद करण्यात आल्याप्रमाणे भरण्यात येईल.

(७) नवीन पंचायत घटीत झाल्यावर, नवीन पंचायत घटीत झाल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, लाभार्थी स्तर उप-समिती पुनर्घटित करण्यात येईल :

परंतु, आधीच्या समितीच्या सदस्यांना, अन्यथा ते पात्र असतील तर, नवीन

समितीवर पुनर्नियुक्तीसाठी कोणतीही आडकाठी करण्यात येणार नाही.".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६० ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम १६० मधील पोट-कलम (१) मध्ये, खंड (क) नंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जेथे गावाच्या हद्दीमध्ये समाविष्ट असलेले कोणतेही स्थानिक क्षेत्र, अशा गावाच्या स्थानिक क्षेत्रातून वगळलेले असेल आणि अशा विद्यमान गावाच्या लोकसंख्येच्या दहा टक्क्यांहून अधिक लोकसंख्या, कोणत्याही प्रकारे बाधित न होता किंवा नव्याने घोषित केलेल्या गावामध्ये स्थलांतरित न होता ते केवळ प्रकल्पबाधित व्यक्तींच्या पुनर्वसनासाठीचे वेगळे गाव असल्याचे घोषित केले असेल तर, अशा प्रकरणात, या खंडामध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशाप्रकारे स्थानिक क्षेत्र वगळणे आणि त्याच्या परिणामी विद्यमान गावाच्या हद्दीत होणारा बदल हा, कलम ४ चे पोट-कलम (२) आणि कलम १६० चे पोट-कलम (१) यामध्ये अभिप्रेत असल्याप्रमाणे अशा गावाच्या हद्दीतील बदल असल्याचे मानण्यात येणार नाही आणि या खंडात तरतूद केल्याप्रमाणे अशा विद्यमान बाधित गावाची विद्यमान पंचायत विसर्जित झाल्याचे मानण्यात येणार नाही आणि पंचायतीचे सर्व सदस्य, त्याच्या मुदतीच्या उर्वरित कालावधीसाठी अशा पंचायतीचे सदस्य असणे सुरू राहील ;".

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १७६ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १७६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (दहा-क) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल

"(दहा-ख) कलम ४९ व ४९-क याअन्वये, ज्यासाठी नियम करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही बाबीसाठी किंवा सर्वसाधारणपणे उक्त कलमांची प्रयोजने पार पाडण्यासाठी ;".

व्यावृत्ती

**६.** (१) मुख्य अधिनियमाच्या कलम ४ अन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना, किंवा मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३ चा कलम ४ हा अंमलात आल्याच्या दिनांकाला किंवा त्यानंतर, मुख्य अधिनियमाखाली काढण्यात आलेला कोणताही आदेश, निर्देश किंवा सूचना, कधीही काढण्यात आलेली नव्हती असे मानण्यात येईल आणि अशी अधिसूचना, आदेश, निर्देश किंवा यथास्थिति, सूचना काढल्याच्या परिणामी, ज्याच्या सीमामध्ये फेरफार करण्यात आले आहेत अशी विद्यमान ग्रामपंचायत विसर्जित होणार नाही किंवा तिचे कधीही विसर्जन झाले नव्हते असे मानण्यात येईल, आणि अशा पंचायतीच्या कोणत्याही सदस्याने, त्याचे पद कधीही सोडले नव्हते असे मानण्यात येईल आणि त्यानुसार, अशा पंचायतीचे सर्व सदस्य, त्यांची मुदत पूर्ण होईपर्यंत सदस्य म्हणून पदावर राहतील आणि ते सतत पदावर होते असे मानण्यात येईल. २००३ चा महा. २३.

(२) अशा विद्यमान पंचायतीच्या सीमांमध्ये फेरफार करणारी, मुख्य अधिनियमाच्या कलम ४ खालील अधिसूचना, मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००३ चा कलम ४ हा अंमलात यायच्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी, आधीच काढण्यात आलेली होती, एवढ्याच केवळ कारणावरून, कोणताही दावा, अर्ज किंवा कोणतीही कायदेशीर कार्यवाही, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्यासमोर दाखल करता येणार नाही किंवा चालवता येणार नाही. २००३ चा महा. २३.

७. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनाला, प्रसंग उद्‌भवेल त्याप्रमाणे अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही कृती आदेशाद्वारे, करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर कोणताही असा आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

८. (१) मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) अध्यादेश, २००३ व मुंबई ग्रामपंचायत (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २००३ हे याद्वारे निरसित करण्यात येत आहेत. २००३ चे महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ व महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशांद्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना, आदेश, निर्देश किंवा सूचना यांसह) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदीन्वये केलेली कृती किंवा, यथास्थिति, कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

## परिशिष्ट-२

### " ग्राम आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती " ची कार्यकक्षा, कर्तव्ये व जबाबदाऱ्या

**कार्यक्षेत्र :—** समितीच्या कार्यकक्षेत ग्रामपंचायतीच्या हद्दीतील सर्व गावे, वाड्या, वस्त्या, पाडे येतील.

**कर्तव्ये :** (I) ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे व्यवस्थापन, देखभाल व दुरुस्ती

(II) गावांच्या पाणीपुरवठा योजनेची अंमलबजावणी करणे

(III) ग्रामपंचायत हद्दीतील परिसर स्वच्छता

(IV) कुटुंब कल्याण व पोषण कार्यक्रम

गावातील सुशिक्षित व काम करण्यास उत्सुक असलेल्या व्यक्तींची निवड करून त्यांची ग्राम पाणीपुरवठा कर्मचारी म्हणून नेमणूक करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे शिफारस करावी. या व्यक्तीस योग्य प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीस मार्गदर्शन करावे. ग्रामपंचायतीने या व्यक्तीचे मानधन/पगार जमा झालेल्या पाणीपट्टीतून भागवावे. समितीने ग्राम पाणीपुरवठा कर्मचाऱ्यांच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यात ग्रामपंचायतीला मदत करावी व तो आपली कर्तव्ये वेळेवर आणि नीटपणे पार पाडतो आहे किंवा नाही यावर नियंत्रण ठेवण्याबाबत मार्गदर्शन व मदत करावी.

ग्राम पाणीपुरवठा कर्मचाऱ्याची कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :—

(१) गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या उद्‌भवाची नोंद ठेवणे.

(२) गावात नळपाणी पुरवठा असल्यास —

(अ) पाणी वेळेवर सोडणे व सर्व वाड्या, वस्त्यांना पुरेशा प्रमाणात पाणी मिळेल याची खात्री करणे.

(ब) नळपाणी पुरवठा यंत्रणेत निर्माण झालेल्या किरकोळ बिघाडाची दुरुस्ती करणे.

(क) दररोज ओ.टी.चाचणी घेणे. ओ.टी.साठी पाणी नमुना गावातील प्रत्येक भागातील, वाड्या, वस्त्यांतील शेवटच्या नळापासून घ्यावयास सुरुवात करून पुढील काही नळांच्या पाण्याची ओ.टी.चाचणी करावी व निष्कर्ष नोंदवहीत लिहावे.

(ड) ओ.टी.निगेटिव्ह असल्यास पाणी नमुना घेऊन एफ.सी.चाचणीसाठी पाठवावा आणि ओ.टी. निगेटिव्ह असल्याची माहिती ग्राम पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य व पोषण समितीस व पाणी पुरवठ्याची निगा राखणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यास द्यावी.

(३) गावास पाणीपुरवठा विहिरीवरून व हातपंपाद्वारे होत असल्यास —

(अ) पिण्याच्या पाण्याच्या सर्व विहिरीच्या पाण्यात टी.सी.एल. पावडर योग्य प्रमाणात व योग्य पद्धतीचा अवलंब करून टाकावी.

(ब) पिण्याच्या पाण्याच्या सर्व विहिरीच्या पाण्याची ओ.टी. चाचणी दररोज घ्यावी व निष्कर्षाची नोंद नोंदवहीत घ्यावी.

(क) ओ.टी. निगेटिव्ह असल्यास पाणी नमुना घेऊन एफ.एफ.सी. चाचणीसाठी पाठवावा व त्यांची नोंद नोंदवहीत घ्यावी. त्यानंतर लगेचच त्या विहिरीत टी.सी.एल. पावडर टाकून पाणी निर्जंतूक करावे.

(४) पिण्याच्या पाण्याच्या सर्वच उद्‌भवाभोवतालचा परिसर स्वच्छ राहील याची काळजी घ्यावी.

(५) पाणीपट्टी वसुलीस ग्रामसेवकास मदत करावी. त्याने केलेल्या कामाची माहिती वेळोवेळी ग्रामसेवक व ग्रामपंचायतीस द्यावी.

(६) प्रत्येक महिन्यात केलेल्या कामाचा मासिक अहवाल विहित नमुन्यात ग्रामसेवकास द्यावा.

**सार्वजनिक विहीर :—**

सार्वजनिक विहिरींच्या बाबतीत समितीने खाली निर्देशिलेल्या बाबींबाबत दक्षता घेण्यात यावी :—

(१) सार्वजनिक विहिरीतील गाळ दोन वर्षांतून किमान एकदा तरी उपसण्यात येतो.

(२) सार्वजिनिक विहिरीत पोहावयास अथवा अन्य कारणांसाठी कोणीही व्यक्ती उतरून पाणी घाण/अशुद्ध केले जात नाही.

(३) सार्वजनिक विहिरींच्या परिसरात कपडे धुणे, भांडी घासणे, आंघोळ करणे, जनावरे धुणे, मलमूत्र विसर्जन इत्यादी आक्षेपार्ह व्यवहार केला जात नाही. तसेच विहिरीवर झाडांच्या फांद्या आल्यामुळे विहिरीत पालापाचोळा अथवा पक्ष्यांची विष्ठा पडत नाही.

(४) खताचे खड्डे/सार्वजनिक-खाजगी संडास, सार्वजनिक विहिरींच्या लगतच्या परिसरात अस्तित्वात नाहीत.

(५) सार्वजनिक विहिरींची पडझड झाल्यास ती पूर्ववत सुस्थितीत राहण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायतीमार्फत कार्यवाही करण्यात येते.

**हातपंप/वीजपंप :—**

विंधण विहिरींवर बसविण्यात आलेल्या हातपंप/विद्युतपंपाबाबत समितीने खाली निर्देशिलेल्या बाबींबाबत दक्षता घेण्यात यावी.

(१) हातपंपाच्या दांड्याशी अथवा वीजपंपाच्या नळ कोंडाळ्याशी गावातील मुले खेळून त्याची मोडतोड होत नाही.

(२) विंधण विहिरींतील पाण्याचा उपसा मोठ्या प्रमाणावर पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी करण्यात येत नाही.

(३) विंधण विहिरींसाठी बांधण्यात आलेल्या ओट्यांवर कपडे धुतले जात नाहीत. तसेच, सदर ओटे फुटलेल्या स्थितीत नाहीत.

(४) विंधण विहिरींच्या आजूबाजूस साठणाऱ्या पाण्यास वाट काढून ते दूरवर सोडून देण्यात येते, ते परिसरात साचून मुरत नाही. तसेच, विंधण विहिरींच्या परिसरात खताचे खड्डे/सार्वजनिक अथवा खासगी संडास नाहीत.

(५) हातपंप/वीजपंप नादुरुस्त झाल्यास, त्यांची वेळच्या वेळी दुरुस्ती केली जात आहे.

(६) हातपंप/वीजपंपासाठी विहित केलेली वर्गणी ग्रामपंचायतीमार्फत प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्यात १५ तारखेपर्यंत जिल्हा परिषदेकडे भरली जात आहे.

**नळ योजना :—**

नळ योजना ही पाणी पुरवठ्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेली अत्यंत महागडी व खर्चीक उपाययोजना आहे, हे लक्षात घेऊन समितीने या उपाययोजनेच्या बाबतीत खाली निर्देशिल्याप्रमाणे काळजीपूर्वक दक्षता घेण्यासाठी ग्रामपंचायतीस मार्गदर्शन व मदत करावी :—

(१) गावातील उंचावरील टाकी व जमिनीवरील टाकीची जागा तसेच, गावात बसविण्यात येणाऱ्या नळ कोंडाळ्याची जागा नळ योजनेच्या संबंधित अभियंत्यांच्या मदतीने/मार्गदर्शनाने ग्रामस्थांची सोय होईल अशा रीतीने निश्चित करावी.

(२) गावातील नळ योजनेच्या वितरण नलिका विहित खोलीवर व गावातील सांडपाण्याच्या गटारापासून सुरक्षित अंतरावर टाकण्यात येत आहे.

(३) उद्भवापासून गावापर्यंत पाणी आणण्यासाठी टाकण्यात आलेल्या उद्धरण वाहिनीची अथवा तीवर बसविण्यात आलेल्या एअर व्हॉल्व्हची विघ्नसंतोषी लोकांकडून मोडतोड केली जात नाही व अशी तोड-फोड निदर्शनास आल्यास, वेळच्या वेळी दुरुस्त केली जात आहे.

(४) उद्धरण वाहिनी/गुरुत्ववाहिनी, उंचावरील टाकी/जमिनीवरील टाकी व वितरण नलिकात गळती आढळल्यास, ती वेळीच दुरुस्त केली जात आहे.

(५) नळांची मोडतोड करण्यात येत नाही, अथवा मोडतोड झाल्यास ते वेळच्या वेळी दुरुस्त करण्यात येत आहेत.

(६) नळातून पाणी वाहून ते फुकट जात नाही अथवा नळ कोंडाळ्याच्या परिसरात साचून राहत नाही, ज्यामुळे गावात डास, माशा इत्यादींचा उपद्रव वाढून साथरोगाचा प्रादुर्भाव होणार नाही.

(७) नळाच्या पाण्याचा बागा शिंपणे, जनावरे धुणे इत्यादी प्रकारे गैरवापर करण्यात येत नाही.

(८) योजनेच्या उद्भवाजवळ अथवा नळ कोंडाळ्याच्या परिसरात कपडे धुणे, भांडी घासणे, जनावरे धुणे, मलमूत्र विसर्जन इत्यादी आक्षेपार्ह व्यवहार केले जात नाहीत व परिसर स्वच्छ ठेवण्यात येत आहे.

(९) योजनेच्या उद्भवात, उंचावरील टाकीत व जमिनीवरील टाकीत ठरावीक कालावधीनंतर पाणी शुद्धिकरणासाठी/ निर्जंतुक राहण्यासाठी ग्राम पंचायतीमार्फत ब्लिचिंग पावडर / टी.सी.एल. पावडर टाकणे अशासारखी व्यवस्था करण्यात येत आहे.

(१०) खताचे खड्डे, सार्वजनिक तथा खाजगी संडास योजनेच्या उद्भव व नळ कोडाळ्यापासून दूर आहेत.

(११) योजनेच्या पाण्याचे नमुने महिन्याच्या १५ तारखेस व ३० तारखेस (फेब्रुवारी महिन्यात २८ तारखेस) नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्राकडे तपासणीसाठी पाठविण्यात येतात व पाणी अशुद्ध /जंतुमिश्रित असल्याचा अहवाल आल्यास, ते शुद्ध करण्यासाठी अहवालात नमूद केलेली कार्यवाही करण्यात येते.

(१२) नळ योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य दराने पाणीपट्टी बसविण्यात आली आहे व ती वेळोवेळी वसूल करण्यात येते.

**कुटुंबकल्याण व पोषण कार्यक्रमाचे विषय :—**

(१) ठरलेल्या दिवशी दिलेली ग्रामभेट.

(२) गरोदर मातांची नोंदणी आणि तपासणी.

(३) आरोग्य संस्थांतर्गत बाळंतपण.

(४) बालकांची जन्म-मृत्यु नोंदणी.

(५) गावातील ० ते ५ वर्षांखालील सर्व बालकांचे लसीकरण.

(६) समाजातील मुलींचे/स्त्रीयांचे घटते प्रमाण लक्षात घेऊन त्यांचे समाजातील स्थान उंचावण्यासाठी चर्चा घडवून आणणे व त्यावर उपाययोजना सुचविणे (उदा.मुलींना शाळेत पाठविणे, उच्च शिक्षणासाठी प्रवृत्त करणे, वयाच्या १८ वर्षांनंतर विवाह करणे इत्यादी).

(७) जननी सुरक्षा योजना व सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजनेतील लाभार्थ्यांना लाभ मिळविण्यासाठी पाठपुरावा करणे.

(८) कुटुंबकल्याण कार्यक्रमामध्ये पुरुषांचा सहभाग वाढविणे (उदा.कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करून घेणे, गरोदरपणामध्ये पत्नीला वेळोवेळी आरोग्य संस्थांमध्ये तपासणीकरिता घेऊन जाण्यासाठी मदत करणे, बालकांच्या लसीकरणामध्ये मदत करणे, दोन अपत्यांमध्ये अंतर ठेवणे, इत्यादी).

(९) किशोरीचे व गर्भवती स्त्रियांचा चौरस आहार/गर्भवती मातेसाठी विश्रांती, पोषण व स्वच्छ पाणीपुरवठा.

(१०) जन्मानंतर अर्ध्या तासात स्तनपान, निव्वळ स्तनपानासाठी आढावा, सहा महिने पूर्ण झालेल्या प्रत्येक बालकास स्तनपानासोबत पूरक आहार देऊन नियमित स्वरूपात अर्धवार्षिक वाढदिवस साजरा करणेबाबत चर्चा व आढावा घेणे.

(११) समुदाय वृद्धिपत्रकाद्वारे बालकांच्या वजनवाढीचे सामाजिक संनियंत्रण करणे, बालकांना कुपोषणातून बाहेर आणण्यासाठी बालकांना दत्तक घेणे, आहाराच्या नियोजनाचा आढावा घेणे.

(१२) कुपोषित बालकांना विशेष आहार व आरोग्य सेवा पुरविण्यासाठी केलेल्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा व पुढील नियोजन.

(१३) बालकांना कुपोषणमूक्त केलेल्या आई-वडिलांचा, दत्तक पालकांचा ग्रामस्थांमार्फत सत्कार करणे.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई